महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर येथील सर्व्हे नं. ५९/२ मधील १.२० हेक्टर आर जमीन मौजे चितळी गावच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी चितळी ग्रामपंचायतीस कब्जेहक्काने हस्तांतरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मशेम २०१९/प्र.क्र.७८/ल-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. मशेम-२०१६/प्र.क्र.९०/ल-७, दिनांक २३/११/२०१९.
२. ग्रामपंचायत, चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर यांचे क्र. जाक्र. २८/२०१८, दिनांक ९/१२८/२०१८ चे पत्र.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे क्र. जमीन/१४९९/चांगदेव/मुल्यांकन/चितळी/ज-४६३, दिनांक १४/०६/२०१९ चे पत्र.
४. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे क्र. मह.कार्या/जमीन२ब/१११६/२०१९, दिनांक २०/०८/२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या चांगदेवनगर मळा येथील गट नं. ५९ मधील सर्व्हे नं. १३ येथील ३.०० हेक्टर आर इतकी शेतजमीन मौजे चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर या गावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाच्या क्र. आयसीएच-३०८९/३४५४/प्र.क्र.४४१/ल-७, दिनांक १६/०२/१९९६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळास एक अपवादात्मक बाब म्हणून चालू बाजारभावाने होणारी रक्कम आकारून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत, चितळी यांनी वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी सर्व्हे नं. ५९/२ मधील १ हे. २० आर इतकी शेतजमीन आवश्यक असल्याचा प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांना सादर केला त्यानुषंगाने शासनास संदर्भ क्र. २ व ३ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार मौजे चितळी या गावच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी यापुर्वी मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर या गावच्या पिण्याच्या पाण्याच्या योजनेसाठी चालू वार्षिक दर विवरणपत्रातील दरावर आधारित बाजारमूल्याच्या १०% रक्कम आकारून महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर येथील शेतजमीन देण्यास मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ७/११/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक २३/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर मौजे चितळी येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेस शेतजमीन देण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :-

शासन निर्णय क्र. मशोम-२०१६/प्र.क्र.९०/ल-७, दिनांक २३/११/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या चांगदेवनगर मळयातील शेतजमीन मौजे पुणतांबा, ता. राहता, जि. अहमदनगर येथील गट नं. २६३ मधील ३.७७ हेक्टर आर इतकी शेतजमीन कब्जेहक्काने हस्तांतरीत करण्यास महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१ अअ च्या पोटकलम (३-अ) अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर मौजे चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर या गावच्या वाढीव पुरवठा योजनेसाठी ग्रामपंचायत चितळी यांना सर्व्हे नं. ५९/२ मधील १.२० हेक्टर आर इतकी जमीन महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २८-१अअ च्या पोटकलम (३-अ) अन्वये चालु बाजारभावानुसार अकृषिक दराने होणारे मुल्यांकनाच्या १०% एवढे मुल्यांकन आकारून कब्जेहक्काने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत जमीन हस्तांतरणाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील :-

(१) प्रस्तुतची जमीन ग्रामपंचायत, चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर भोगवटादार वर्ग - २ म्हणून धारण करील.

(२) सदर जमिनीचा वापर चितळी गावच्या वाढीव पाणीपुरवठा योजना या प्रयोजनासाठीच करणे बंधनकारक राहील.

(३) मौजे चितळी ग्रामपंचायतीने पाणीपुरवठा योजना विकसित केल्यानंतर त्याबाबतची माहिती सर्व कागदपत्र पाणीपुरवठा योजनेच्या आराखडयासह जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्यामार्फत शासनास सादर करणे सदर ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील.

(४) वरील अटी व शर्तींचा भंग झाल्यास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६१४५३०११९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI S
CHOURE

Digitally signed by SHIVAJI S CHOURE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=fa37c7e079f23b78a27c84b9d6e46f94d549fc79ba170d5815f3619617b13313, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=03fe2b2d715bed4b0d90a99525ae06946672e68ea905c97da50b34fd21223011, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHIVAJI S CHOURE
Date: 2019.09.16 14:59:15 +05'30'

(शिवाजी चौरे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) मा. मंत्री, (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय ,मुंबई
४) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
६) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग
७) जिल्हाधिकारी, अहमदनगर
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर
९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे
१०) सरपंच, ग्रामपचायंत चितळी, ता. राहता, जि. अहमदनगर
११) निवडनस्ती, कार्यासन ल-७ (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई.